# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दि.१३/९/२००५.

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

प्रस्तावाचा विषय - मागील दिनांक ११-८-०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणें.

-**-

प्रस्तावाचा मजकूर - मागील दिनांक ११-८-०५ रोजी झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणेंसाठी मा.खास सभेपुढे ठेविले.

मा.खास सभेपुढील चर्चा :

१) डॉ.योगिता सत्रे - मागील दि.११-८-०५ च्या सभेपुढे विषय क्र.४ मध्ये महिला व बाल कल्याण समितीच्या सभेस अधिकार प्रदान करण्याचा ठराव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३० (६) अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. त्या विषयामध्ये महिला व बाल कल्याण समितीने घेतलेला निर्णय अंतिम असेल अशा बाबतीत अधिकार प्रदान करावे व त्यानंतर त्याला महासभेच्या मंजुरीची गरज भासणार नाही, असे या मंजूर झालेल्या ठरावात स्पष्ट नमूद करावे, अशी दुरुस्ती ठरावात करावी असे सुचविले. व त्यावर सौ.मंगला गुंदेचा यांनी अनुमोदन दिले.

२) मा.श्री.दिपक सुळ - मागील सभेच्या वेळी विषय क्र.५ बाबत मा.सदस्यांच्या यादीवरुन विषय घेण्यात आलेला होता. अंतर्गत सुधारणाबाबत माहिती देउ असे त्यावेळी सांगण्यात आले होते. सदरची माहिती देण्यात यावी. याबाबत मंजूर झालेला ठराव नगररचनाकार श्री.धोंगडे यांनी वाचून दाखविला. यावर श्री.सुळ यांनी सांगितले की, स्ट्रीट लाईटबाबतही ठराव केलेला होता. त्याबाबतही नमूद केले आहे काय? असे विचारले. यावर मा.आयुक्त साहेब, यांनी खुलासा केला की, नियमात स्पष्ट तरतूद असल्याप्रमाणे तरतुदी लागु होतील. विहीत खर्च संबंधीताकडून वसुल होणार आहेच. पुढील बोर्डाचे वेळी सविस्तर माहिती देउ असे ठरविण्यात आलेले होते. ज्या अभिन्यासाला अंतिम मंजूरी दिलेली आहे. त्याबाबत आक्षेप होते. याबाबत सविस्तर माहिती देताना काय कारवाई केली. यावर नगररचनाकार श्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, अशा अभिन्यासाबद्दल माहिती काढावी लागेल. ३ टक्के रक्कम भरलेल्यांना अंतिम मंजूरी देण्यात आलेली नाही. गटारी व इतर सोयीबाबत रक्कम वसुल करण्यात येणार आहे.

३) मा.श्री.मिलींद गंधे - ले आउट मंजूरी करताना ले आउट धारकाची स्वाक्षरीची अट रद्द् करावी. सौर उर्जा व इतर बाबत बांधकाम परवानगी देताना अटी विचारात घ्याव्यात.

यावर मा.आयुक्त साहेब यांनी खुलासा केला की, सौर उर्जाबाबत शासनाची नियमांना मंजूरी मिळाल्यानंतर अंमलबजावणी केली जाईल.

मा.श्री.गंधे यांनी सांगितले की, बिल्डरमार्फत बांधकामे होउन ती संबंधीतांना हँडओव्हर केली जातात. तथापी ते करु शकणार नाहीत असे सांगितले. यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, शासनाकडे ठराव पाठविलेला आहे.

४) मा.श्री.संदिप कोतकर - नगररचना विभागाकडून मंजुरी देताना मंजुरी दिल्यानंतर संबंधीत बिल्डर हे संबंधीत ले आउटमधील ओढे, नाले इत्यादी बंद करतात. त्यामुळे पुढे

त्याबाबतचे प्रश्न निर्माण होतात. याबाबत दखल घेणे आवश्यक आहे. याबाबत मा.महापौर यांनी सांगितले की, हे नगररचना विभागाचे काम आहे. त्यावर श्री.धोंगडे, नगररचनाकार यांनी खुलासा केला की, खाजगी शेतजमिनी यातील मोजणी नकाशा मध्ये नाले,ओढे इत्यादींचा समावेश केलेला नसतो. त्याबाबत मोजणी खात्याशी पत्रव्यवहार केलेला आहे. व त्यामध्ये ओढे,नाले,वृक्ष इत्यादी नैसर्गिक बाबीबाबत उल्लेख केला पाहिजे असे सांगितले आहे. यावर मा.आयुक्त यांनी सुचविले की, नदी,नाले,ओढे इ. रेड झोन मार्क करुन घ्यावे.

ठराव - संपूर्ण कार्यवृत्तावर चर्चा करण्यात येवून दि.११-८-२००५ रोजी झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे.चर्चेत सुचविल्याप्रमाणे ठरावात दुरुस्ती करुन घेणेबाबत मंजूरी देण्यात येत असून, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.ठराव सर्वानुमते मंजूर.सुचक : मा.डॉ.सौ.योगिता रंजित सत्रे, अनुमोदक : मा.श्री.सुरेशराव छबुराव शेळके

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दि.१३/९/२००५.

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नियुक्तीच्या निविदेस मंजूरी देणेबाबत ऑफीस रिपोर्ट.

-**-

प्रस्तावाचा मजकूर - अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर महासभा ठराव क्रमांक ३ दिनांक ११-८-२००५ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात जकात वसुली कामी दिनांक २७-८-२००५ ते २६-८-२००६ किंवा सक्षम प्राधिकरणांच्या मंजुरीने बदल केलेल्या अशा एक वर्षाच्या कालावधीसाठी किमान देकार रक्कम रूपये ३३,११,६३,३०८ /- (तेहतीस कोटी अकरा लाख त्रेसष्ठ हजार तीनशे आठ फक्त) इतकी रक्कम निश्चित करून जकात अभिकर्ता नेमणुकीचा ठराव पारित झाला आहे.

सदर ठरावास अनुसरून जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी दैनिक सकाळ, दै.महाराष्ट हेरॉल्ड या अनुक्रमे मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये दिनांक १२-८-२००५ रोजी व दै.नवा मराठा मध्ये दिनांक १३-८-२००५ रोजी जाहिर निविदा प्रसिध्द करण्यांत आली. अभिकर्त्याने निविदा न्यावयाची व निविदा भरून द्यावयाची मुदत दिनांक १२-८-२००५ ते २४-८-२००५ अशी ठेवण्यांत आली. या कालावधीत एकुण १५ निविदा फॉर्म विक्री करण्यांत आले. त्यापैकी खालील ७ निविदा धारकांनी दिनांक २४-८-२००५ रोजी दुपारी ४.०० वाजेपावेतो विहित मुदतीत आयुक्त कार्यालयात बंद लिफाफ्यात निविदा सादर केल्या.

| | |
|---|---|
| १ | मे.दौलती नागरी सहकारी संस्था मर्या .,मालेगांव |
| २ | मे.श्री.साई एन्टरप्रायजेस,उल्हासनगर |
| ३ | मे.सहकार एजन्सीज प्रा.लि.,मालाड,मुंबई |
| ४ | मे.साई शरण इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी , उल्हासनगर |
| ५ | मे.कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,उल्हासनगर |
| ६ | मे.ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर ,कल्याण |
| ७ | मे.सिग्मा इन्फ्रास्ट्रक्चर , उल्हासनगर |

वरील निविदा दिनांक २५-८-२००५ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.आयुक्त साहेब यांचे दालनात उघडण्यांत आल्या. त्यावेळी मा.महापौर श्री.भगवान फुलसौंदर, मा.स्थायी समिती सभापती , श्री.मनेष साठे ,मा.उपायुक्त .डॉ.सुनिल लहाने , मुख्य लेखा परिक्षक श्री.पी.आर.गोरे हे उपस्थित होते. तसेच वरील अधिकारी पदाधिका-यांचे व्यतिरिक्त निविदाकारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अशा प्रकारे अधिकारी ,पदाधिकारी व निविदाकार यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत प्राप्त निविदा उघडण्यांत आल्या.

सर्व उपस्थितांमध्ये झालेल्या चर्चेनुसार सर्वात शेवटी प्राप्त झालेल्या निविदा पासुन सुरूवात करून क्रमाक्रमाने निविदा उघडण्यांत आल्या. मे.सिग्मा इन्फ्रास्ट्रक्चर , उल्हासनगर यांचा निविदा लिफाफा उघडला असता निविदे सोबत इसारा रक्कमेचा डी.डी.दिला नव्हता. संबंधितांकडे चौकशी केली असता डी.डी.सोबत

नसल्याचे सिग्मा इन्फ्रास्ट्रक्चर यांनी मान्य केले. त्यामुळे टेंडर अटी शर्तीतील अट ५ व ६ नुसार त्याचा देकार अग्राहय ठरल्यांने त्यांची दराची निविदा उघडण्यांत आली नाही. तसेच मे.दौलती नागरी सहकारी संस्था मर्यादीत मालेगांव, यांचे निविदा लिफाफ्यात इसारा रक्कमेचा डी.डी.नसुन सुशिक्षीत बेकार योजनेखाली इसारा रक्कम माफी संबंधीचे प्रमाणपत्र होते. अशा प्रमाणपत्रानुसार सुट देण्यांबाबत निविदा दस्तऐवजात तरतूद नसल्यामुळे टेंडर अटी शर्ती नुसार त्याचा देकार अग्राहय ठरल्यांने त्यांची दराची निविदा उघडली नाही. उघडलेल्या निविदाचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ. नं. | निविदाकार फर्म / व्यक्तीचे नांव | निविदेतील देकार रक्कम | किमान देकार रक्कमे पेक्षा | रकाना ४ व ५ नुसार | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जास्त / कमी | जास्त | कमी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मे.सिग्मा इन्फ्रास्ट्रक्चर , उल्हासनगर | बयाणा रक्कम डी. डी.नसल्यामुळे दराचा लिफाफा उघडला नाही. | -- | -- | -- | अग्राहय निविदा |
| २ | मे.ग्लोबल इन्फ्रास्ट्रक्चर ,कल्याण | ३५,३६,३७,३८७ /- | जास्त | २,२४,७४,०७९/- | -- | |
| ३ | मे.कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,उल्हासनगर | २८,८०,००,००० /- | कमी | -- | ४,३१,६३,३०८/ | |
| ४ | मे.साई शरण इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी , उल्हासनगर | ३६,९९,९९,९९९ /- | जास्त | ३,८८,३६,६९१ /- | -- | |
| ५ | मे.सहकार एजन्सीज प्रा.लि.,मालाड,मुंबई | ३३,६३,६३,३६३ /- | जास्त | ५२,००,०५५ /- | -- | |
| ६ | मे.श्री.साई एन्टरप्रायजेस, उल्हासनगर | ४०,४१,००,००० /- | जास्त | ७,२९,३६,६९२ /- | -- | |
| ७ | मे.दौलती नागरी सहकारी संस्था मर्या .,मालेगांव | बयाणा रक्कम डी. डी.नसल्यामुळे दराचा लिफाफा उघडला नाही. | -- | -- | -- | अग्राहय निविदा |

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता अ.क्र.६ चे मे. मे.श्री.साई एन्टरप्रायजेस,यांची सर्वाधीक देकार रक्कम नमुद असलेली निविदा स्विकारार्ह आहे. त्यांनी त्यांचे निविदेसोबत पत्र देवुन काही अटी नमुद केल्या आहेत. तथापी त्यांचे अथवा अन्य कोणत्याही निविदाकाराच्या निविदा दस्तऐवजातील नमुद अटी शर्ती व्यतीरिक्त अन्य अटी / शर्ती , निविदेतील शर्त क्र. ६ (ii) पृष्ठ क्र.६ अन्वये विचारात घेण्यांचा प्रश्न उदभवत नाही.

किमान देकार रकमेपेक्षा प्राप्त निविदा ही जास्त असल्याने मे.श्री.साई इन्टरप्रायजेस यांची निविदा मंजूर करणेंस व सुरक्षा अनामत (बँक गॅरंटी) व करारनाम्यासाठी त्यांना सुचीत करणेंसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करण्यात आली.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांनी अभिप्राय दिला की ,

"अ.नं ६ श्री.साई एन्टरप्रायजेस यांची जादा दराची निविदा स्विकारणेस हरकत नाही."

यावर मा.उपायुक्त (सामान्य ) यांनी अभिप्राय दिला की ,

" वरील अहवालानुसार कमाल देकार रकमेची मे.साई एन्टरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेसाठी शिफारस आहे. "

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की ,

" उपरोक्त कार्यालयीन प्रस्तावाचे अवलोकन केले. प्राप्त एकूण ७ (सात ) निविदापैकी २ (दोन ) निविदा विहित बयाणा रक्कम भरलेली नसल्याने त्या निविदा अग्राहय आहेत.उर्वरीत निविदापैकी प्रस्तावीत मे.श्री.साई एन्टरप्रायजेस,उल्हासनगर यांची निविदा सर्वोच्च दराची आहे.तसेच त्यांची रक्कम देकार रक्कमेपेक्षा रुपये ७ कोटी २९ लक्ष ३६,६९२ ने जास्तीची असल्याने मनपाचे आर्थीक हिताची आहे.सबब मे.श्री.साई एन्टरप्रायजेस,उल्हासनगर यांची निविदा स्विकारणेस हरकत नाही. "

अशाप्रकारे मा.आयुक्त साहेब यांचे शिफारशीप्रमाणे सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेविला असता मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १ दिनांक ३१/०८/०५ अन्वये पुढीलप्रमाणे ठराव पारीत झाला आहे.

**ठराव** - "अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रात आयात होणा-या जकात पात्र मालावर वसुली कामी दिनांक २७/८/२००५ ते २६/८/२००६ अखेर कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणेकामी मागविण्यात आलेला निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफीस रिपोर्ट पहाता सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेनुसार सदर प्रस्ताव बहुमताने नामंजूर करण्यांत येत आहे.

आयुक्तांनी जकात ठेका निविदा मधील अटी शर्ती नुसार कार्यवाही करावी."

ठरावाच्या बाजूने मतदान केलेले सदस्य.

१.मा.श्री.साठे मनेष दशरथ,सभापती,स्थायी समिती

२.मा.श्री.गंधे मिलींद सदाशिव

३.मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद

४.मा.श्री.दातरंगे अर्जुन भाउत्साहेब

५.मा.श्री.उडाणशिवे भाउत्साहेब भिमाजी

ठरावाच्या विरोधात मतदान केलेले सदस्य

१.मा.श्री.चोपडा संजय फुलचंद

२.मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंमतलाल

३.मा.श्री.चव्हाण दिप नारायण

४.मा.श्री.जाधव कृष्णा दत्तात्रय

५.मा.श्री.कोतकर भानुदास एकनाथ

६.मा.श्री.जगताप नितीन विलास

वरीलप्रमाणे ठराव पारित होउन जकात ठेका देण्याबाबतचा प्रस्ताव नामंजूर झालेला आहे.परंतू जकात ठेका दिल्यास मनपाचे आर्थीक उत्पन्नात भरच पडणार आहे.त्यामुळे जकात ठेका देणे मनपाचे दृष्टीने हितकारकच ठरणार आहे. सबब निविदा फॉर्म मधील नियम क्रमांक ६ नुसार सदरचा प्रस्ताव अखेर मंजूरीसाठी मा.महासभेपुढे सादर.

यावर मा.उपायुक्त (सामान्य ) यांचा अभिप्राय की,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४ मध्ये महानगरपालिका प्राधिकरणे नमुद असून या कलमातील तरतूदीनुसार महानगरपालिका ही स्थायी समितीच्या वरिष्ठ प्राधिकरण आहे.

प्राप्त निविदांपैकी कमाल निविदा ही महानगरपालिकेच्या आर्थिक हिताची आहे.तरीसुध्दा सुयोग्य कारणे नमुद न करता मा.स्थायी समितीने बहुमताने ही निविदा दिनांक ३१/०८/२००५ च्या बैठकीत फेटाळली आहे.

निविदा अटी शर्तीमध्ये अट क्रमांक ६ मध्ये पुढील प्रमाणे तरतूदी आहेत.

"6 (viii) The Commissioner shall put the maximum offer (if it is more than minimum offer amount) for final approval in front of Standing Committee within three days from opening of tender and Standing Committee shall decide the tender within 7 days from the date of report submitted by Commissioner.

(ix) If the maximum offer received is more than the minimum offer amount and the Standing Committee failed to accept the received offer within prescribed time the Commissioner shall put the offer for discussion in front of the Corporation. The Corporation shall decide this proposal within 7 days in a special meeting.

वरील ६ ही तरतूद व मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (ई) विचारात घेता सर्वात जास्त वर नमुद केलेली मे.श्री.साई एन्टरप्रायजतेस यांची रुपये ४०,४१,००,०००/- (अक्षरी रुपये चाळीस कोटी एक्केचाळीस लक्ष फक्त ) इतक्या रकमेची निवीदा स्विकृतीसाठी मा.महानगरपालिकेच्या विशेष सभेकडे पाठविण्यासाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,

मा.महासभेच्या ठराव क्रमांक ३ दिनांक ११/८/०५ अन्वये जकात अभिकर्ता नियुक्तीसाठी जाहिर निविदा मागविल्या होत्या. कार्यालयीन प्रस्तावाप्रमाणे शिफारस केलेली सर्वोच्च देकाराची निविदा मनपाचे आर्थीक हिताची आहे.मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १ दिनांक ३१/०८/०५ अन्वये कार्यालयीन प्रस्ताव बहूमताने नामंजूर केला.सदरचे ठरावात चर्चेत सन्माननिय सदस्यांनी मांडलेले मुद्ये ठोस स्वरुपाचे नाहीत. व प्रस्ताव नामंजूर केल्याने महानगरपालिकेचे ७ कोटी २९ लाख रुपयाचे आर्थिक नुकसान होणार आहे. सदरचे आर्थिक नुकसानीमुळे मनपास मुलभूत सेवा - सुविधा पुरविणेत अडथळा निर्माण होवून मनपा प्रशासन कोलमडण्याची शक्यता आहे.त्याचप्रमाणे मनपास आर्थिक आणिबाणीची परिस्थिती निर्माण होणार आहे.सबब मा.स्थायी समितीचा सदरचा निर्णय मनपाचे आर्थिक हिताविरुध्द व आर्थिक नुकसानीचा असल्याने तो विखंडीत करणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करावा.

उपरोक्त बाबी विचारात घेता कार्यालयीन प्रस्तावाप्रमाणे जकात अभिकर्ता नियुक्तीसाठी प्राप्त निविदेपैकी सर्वोच्च देकाराची प्रस्तावीत निविदा स्विकारणेस हरकत नाही.सदरचे बाबतीत मा.महासभेच्या विशेष बैठकीत निर्णयासाठी सादर.अशाबाबतचा ऑफीस रिपोर्ट मा.आयुक्तसाहेब, तसेंच मा.उपायुक्त साहेब यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर.

--*--

चर्चा :

१) मा.श्री.आसाराम कावरे - जकातीचा ठेका देण्यात यावा. कारण यामध्ये ७ कोटी ४१ लाखाचा महानगरपालिकेला फायदा होणार आहे. यापूर्वी व्यापा-यांना १० वर्षे जकात माफ केलेली होती. त्यामुळे ठेकेदारांना १ वर्षासाठी जकात वसुली देण्यास हरकत नाही. कर्मचा-यांचे पगार थकलेले आहेत. ५व्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यात आलेली नाही. त्यामुळे जास्तीत जास्त रक्कम देणारे ठेकेदारास ठेका देण्यात यावा.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - जकात लावावयाची कि नाही हा प्रश्न या ठिकाणी निर्माण होत नसून जकात लावलेली आहेच. फक्त ठेकेदाराकडून वसुली करावयाची किंवा कसे? अशाबाबतचा आजचा विषय आहे. स्थायी समितीने सदरचा विषय नामंजूर केलेला आहे. सदरचे काढण्यात आलेले टेंडर हे आर्थिक वर्षाकरीता काढलेले नाही. याबाबत दर आणि करास मंजूरीबाबत चर्चा झालेली नाही. आमच्या मते पुन्हा याबाबत चर्चा करुन फेब्रुवारीमध्ये जकात लागु करावी. प्रशासनाकडून चुका झाल्या

तर सर्वच गोष्टी कळतात असे नाही. याबाबत इतके गंभीर परिणाम होतील अशी जाणीव नव्हती. बाहेरचे गुंड येउन येथे जकात वसुल करु शकतील एवढी घाई कशासाठी.

ठेका ३१ ऑगस्ट २००५ ते ऑगस्ट २००६ अखेर आहे. तो कालावधी मार्च अखेरपर्यंत घ्यावयास पाहिजे होता. जकात ३१ मार्च पर्यंत टेंडर देउ नये. जकात महानगरपालिका कर्मचा-यां मार्फत वसुल करावी.

३) मा.श्री.संजय चोपडा - जकातीला विरोध नाही. दर आणि कर ठरविणेबाबत व्यापा-यांना विश्वासात घेउन ठरवू असे सांगितले होते. आजही व्यापारी जकात भरुनच माल आणत आहेत. मात्र जकात वसुली ठेकेदारास देण्यात येउ नये.

४) मा.श्री.दिपक सुळ - व्यापा-यांनी जकात भरावयाची तर ठेकेदार यांच्याकडे भरली काय किंवा महानगरपालिका कर्मचा-यांकडे भरली काय? ठेकेपध्दतीमुळे महानगरपालिकेला ७ कोटी रुपये जादा मिळणार आहेत. यामध्ये आस्थापना खर्चाचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे जकात ठेका देण्यास हरकत नाही. ब-याच प्रायव्हेट कंपन्या जकात चोरुन आणतात. त्यामध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. व आर्थिक हिताच्यादृष्टीने ठेकेदारास ठेका देणेस हरकत नाही. कराचे दर हे वाढलेले नाहीत तर हे दर पूर्वीचेच सन १९८४ पासूनचे आहेत. फक्त आता किंमती वाढलेल्या आहेत. म्हणून जकात वाढल्याचे दिसते.

५) मा.श्री.दिप चव्हाण - महानगरपालिकेने स्थायी समितीला निर्णय घेण्याचे अधिकार प्राप्त करुन दिले असताना व स्थायी समितीमध्ये दि.३१-८-०५ रोजी याबाबतचा ठराव नामंजूर केल्यानंतर सभागृहामध्ये सदरचा ठराव येण्याचा संबंधच येत नाही. कार्यालयाने तोच तोच रिपोर्ट पुन्हा ठेवलेला आहे. त्यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. त्यामुळे तो येथे येण्याचा संभवच नव्हता. मिस्कीन मळाबाबतचा ठराव अशाच प्रकारे नामंजूर झाला होता. तो येथे का घेतला गेला नाही? मागे मा.जिल्हाधिकारी देवरा साहेब यांनी अभिकर्ता नेमण्याचा प्रस्ताव मे.शासनाकडे पाठविला होता. त्यावर शासनाने तो प्रस्ताव स्थायी समिती / महासभेपुढे ठेवणेबाबत महापालिकेस कळविलेले होते.

अशा प्रकारे स्थायी समितीच्या हक्कावर गदा आणली जात आहे असे दिसते. यापूर्वी २४ कोटी रुपयांचा प्रस्ताव नामंजूर का केला होता? चालू वर्षी जकात बाबत बजेट हेड नाही. बजेट मध्ये जकात कायदा ॲबॉलीश केला आहे.

महानगरपालिकेमध्ये जकातीचे पैसे कोणत्या खात्यात भरण्यात येतात याचा खुलासा करावा. माझे माहितीप्रमाणे सदरचे पैसे रोजगार हमी व शिक्षण कर खात्यात भरले जातात. यामध्ये सभागृह व जनतेची दिशाभूल केली जात आहे.

जकात ठेक्याबाबत स्थायी समितीच्या निर्णयानंतर १४ दिवसांनी मिटींग घेतली. ती ७ दिवसात घेणे आवश्यक होते. त्यामुळे मिटींग बेकायदेशीर आहे. शहरामध्ये शांतता व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउन नागरिकांना त्रास होणार आहे. पैशासाठी काहीही करावयाचे असे ठरवले आहे काय.त्यापेक्षा महानगरपालिकेने सावकारी पतपेढी अथवा बँक स्थापन करावी. अंदाजपत्रकामध्ये २४ कोटीचा अंदाज असताना ४० कोटीवर ठेका कसा काय गेला?

महानगरपालिका कर्मचा-यांवर अविश्वास दाखवू नका. शहराची शांतता भंग होईल. ठेका देण्यामध्ये कोणते हित आहे. ठेकेदार यामधून ५० कोट वसुल करणार आहे. याचा सर्व बोजा जनतेवर पडणार आहे. हे कायदयाला धरुन नाही. पध्दत बेकायदेशीर आहे. ठेकेदाराला ठेका दयावयाचा असा आपण ठेका घेतला काय?

स्थायी समितीचे अधिकाराबाबत काय तरतुदी आहेत हे स्पष्ट करावे. व खुलासा करावा असे सुचविले.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये ३ ॲथॉरिटी आहेत. १) आयुक्त २) स्थायी समिती व ३) महासभा. महासभा ही सर्वोच्च आहे. स्थायी समितीचा ठराव विखंडीत करणेबाबत शासनाकडे पाठविलेला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण यांनी यावर सांगितले की, ठेकेदारी पध्दतीस माझा विरोध आहे. मी या ठिकाणी मत मांडण्यास आलेलो नाही. एकदा स्थायी समितीला अधिकार दिलेले असताना व ठराव एकमताने फेटाळलेला आहे. तोच ठराव पुढे मांडलेला आहे. त्यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, महासभा ही सर्वोच्च सभा आहे. त्यावर श्री.दिप चव्हाण यांनी ठेकेदारीस विरोध आहे असे सांगितले. मा.महापौर यांनी तुमचा विरोध आहे असे नोंदवून घेतले जाईल हे सांगितले. तथापी स्थायी समितीने एकदा फेटाळलेला ठराव पुन्हा घेतला तर जबाबदारी त्यांचीच राहील असे सांगितले.

६) मा.श्री.नामदेव पवार - ठेका ऑगस्ट ०५ ते ऑगस्ट ०६ असे आहे. बजेट मार्च पर्यंतच आहे. एस्कॉर्ट रु.२० ऐवजी ५० करावा. इतर महानगरपालिकेमध्ये ५० ते १५० रुपये पर्यंत आहे. ३१ मार्च पर्यंत कर्मचा-यामार्फत वसुली करुन मार्च नंतर ठेक्याबाबत विचार करावा. जकात दर निश्चित करुन पुन्हा नव्याने विषय घ्यावा. महानगरपालिका कर्मचा-यामार्फत जकात चालू आहेच. महानगरपालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा.

७) मा.श्री.सुरेश शेळके - ठेक्याला मंजुरी दयावी. त्यासाठी ओपन मतदान घ्यावे असे सुचविले.

८) मा.श्री.किशोर बोरा - प्रशासन स्वतः जकात वसुल करते. त्यावर विश्वास का ठेवला जात नाही. प्रशासनामार्फत ४१ कोटी रुपयांपेक्षा जास्त जकात वसुल होउ शकते. न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे. जकातीचे वसुल होणारे पैसे सध्या वापरता येत नाही. न्यायालयीन निकालानंतर ठेकेदारीबाबत निर्णय घ्यावा. ठेकेदारीस विरोध नोंदवावा असे सुचविले.

९) मा.श्री.त्रिपाठी - जकात अभिकर्ता नेमण्यास विरोध आहे. व्यापा-यांबददल दुराग्राह चालू आहे. व्यापारी सुध्दा नागरिक आहेत. जकात न लावणेबाबत यापूर्वी आश्वासन दिलेले होते. स्थायी समितीने जकातीचा विषय नामंजूर केलेला आहे. यापूर्वी शेतमालाला अर्धा टक्का जकात होती. ती १० पट झालेली आहे. डिझेलवर पुणे येथे ३ टक्के, नाशिक येथे २ टक्के तर नगरने ४ टक्के लावलेली आहे. याचा विचार झाला पाहिजे.

यावर श्री.सुरेश शेळके यांनी सांगितले की, सन १९९९ पासून जकात कर नव्हता. त्यानंतर पेट्रोल डिझेलचे दर कमी झालेले होते काय? अशी विचारणा केली.

त्याच वेळेस सभागृहामध्ये गोंधळ निर्माण झाला. व त्याचवेळी सर्वश्री त्रिपाठी, श्री.शेळके, श्री.कोतकर, श्री.गंधे, श्री.सुळ इ.नगरसेवक बोलत होते.

१०) मा.श्री.भानुदास कोतकर - सर्वसाधारण सभेच्या वेळी महानगरपालिका कर्मचा-यांनी खाली धरणे धरुन घेराव घातलेला आहे. त्यांच्या आंदोलन ठेका मंजूर करणेसाठी त्यांना तसा अधिकार आहे काय? त्या कर्मचा-यांवर कारवाई करण्यात यावी.

जकातीचे ठेका देणेबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीने नामंजूर केलेला आहे. तथापी जकात लावू नये असे म्हणणे नाही. परंतु शहरातल्या नागरिकांवर दरडोई १६००/- रु.इतका टॅक्स बसणार आहे. महानगरपालिकेने एस्कॉर्ट २० रु.लावला आहे त्याऐवजी इतर महानगरपालिकेच्या माहितीच्या आधारे एस्कॉर्ट दर लावावा. व जकातीचे दर कमी करावेत. महानगरपालिकेने जकातीला पर्यायी उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करावेत. एस्कॉर्ट कर लागु केल्यास दररोज ८ लाख रु. उत्पन्न मिळते. व उर्वरीत रकमेकरीताच जकात कर लावावा असे सुचविले.

मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, जकातीच्या आंदोलनाबाबत कर्मचा-यांच्या संघटनेनी महानगरपालिकेला कळविलेले नाही. त्याबाबत नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

त्यानंतर मा.श्री.कोतकर यांनी सांगितले की, ठेकेदारीस कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस यांचा विरोध आहे. विरोध नोंदवावा असे सांगितले.

मा.आयुक्त यांनी आर्थिक जबाबदारीबाबत महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर वेतनासाठी तसेच मुळा पाणीपुरवठा बील इ. तसेच दैनंदिन खर्च मोठया प्रमाणावर करावा लागत आहे. दरमहा अंदाजे ३ कोटी रु. यासाठी लागतात. त्यासाठी आर्थिक हिताच्या जबाबदारीचे निर्णय घ्यावयास पाहिजे.

११) मा.सौ.गंगेकर - व्यापा-यांचा जकातीस विरोध नाही. मनपा कर्मचा-यामार्फत जकात वसुली करावी.

१२) मा.श्री.गंधे - भाजपा शिवसेना यांनी जकातीस सुरुवातीस विरोध केलेला होता. तथापी आर्थिक चित्र नंतर स्पष्ट झाल्याने यास आम्ही पाठींबा दिलेला आहे. यापूर्वी अभिकर्ता नेमण्यास मंजुरी दिलेली होती. व स्थायी समितीने याबाबत विचार करुन मंजूर करावा असा प्रस्ताव मांडलेला होता. त्यामुळे हा प्रस्ताव महासभेपुढे आलेला आहे. विकासासाठी जकात आवश्यक आहे. कर्मचा-यांमार्फत ५० टक्के वसुली होत आहे. जकात ३६५ दिवसांसाठी आहे. १ वर्षानंतर आपणास फेरविचार करता येईल. तरी ठेकेदारीस मंजुरी दयावी असे सुचविले. याबाबत आचारसंहिता तयार केलेली आहेच.

शेवटी मा.महापौर यांनी याबाबत मतदान घेण्यात येईल असे जाहीर केल्यानंतर हात उंचावून मतदान घेण्यात आले.

--*--

**ठराव :** अहमदनगर महानगरपालिकेच्या जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणुकीच्या निविदा प्रस्तावावर मा.महासभेत सर्व सभासदांची साधक बाधक चर्चा होउन असे ठरविण्यांत आले की,मे.श्री.साई एंटरप्रायजेस , उल्हासनगर यांची स्पर्धात्मकदृष्टया सर्वात जास्त असलेली देकार रक्कम रू.४०,४१,००,००० /- ची निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव मतदानासाठी टाकण्यांत आला. मतदान हात वर करून घेण्यांत आले. त्यामध्ये ठरावाच्या बाजुने खालील २८ सदस्यांनी मतदान केले.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.फुलसौंदर भगवान प्रल्हाद |
| २ | मा.श्री.खांडरे ज्ञानेश्वर सदाशिव |
| ३ | मा.श्री.शेळके सुरेश छबुराव |
| ४ | मा.श्री.साठे मनेष दशरथ |
| ५ | मा.सौ.सत्रे योगिता रंजित |
| ६ | मा.श्री.सुळ दिपक वसंतराव |
| ७ | मा.श्री.मैड सतिष बबनराव |
| ८ | मा.श्री.दातरंगे अर्जुन भाउसाहेब |
| ९ | मा.सौ.सय्यद वर्षा अरिफ |
| १० | मा.सौ.शेख सुरैय्या लियाकत |
| ११ | मा.सौ.साहनी सुनिता राकेश |
| १२ | मा.सौ.मोरे सविता दिलीप |
| १३ | मा.श्री.बारस्कर पोपट जगन्नाथ |

| | |
|---|---|
| १४ | मा.श्री.डागवाले किशोर आसाराम |
| १५ | मा.श्री.कावरे आसाराम हरिभाऊ |
| १६ | मा.श्री.गंधे मिलिंद सदाशिव |
| १७ | मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद |
| १८ | मा.श्री.तिवारी सुरेश रतनप्रसाद |
| १९ | मा.श्री.बोरूडे अनिल वसंतराव |
| २० | मा.सौ.गुंदेचा मंगला सतिष |
| २१ | मा.सौ.सकट पवित्रा भाऊ |
| २२ | मा.सौ.दहिफळे कविता अशोक |
| २३ | मा.सौ.शिंदे कांताबाई अरूण |
| २४ | मा.सौ.शेंडगे रोहिणी संजय |
| २५ | मा.सौ.गुरूड राधा रमेश |
| २६ | मा.सौ.बिज्जा अर्चना संतोष |
| २७ | मा.सौ.मुदगल सुनिता दत्तात्रय |
| २८ | मा.बोरूडे इंदुबाई परशुराम |

तसेच ठरावाचे विरोधात खालील २४ सदस्यांनी मतदान केले.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.कोतकर भानुदास एकनाथ |
| २ | मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंमतलाल |
| ३ | मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण |
| ४ | मा.श्री.उडाणशिवे भाऊसाहेब भिमाजी |
| ५ | मा.श्री.शिंदे दशरथ बाबु |
| ६ | मा.श्री.जाधव कृष्णा दत्तात्रय |
| ७ | मा.श्री.सय्यद सादिक अरिफ |
| ८ | मा.सौ.भागानगरे मनिषा प्रकाश |
| ९ | मा.श्री.चव्हाण दिप नारायण |
| १० | मा.श्री.गव्हाळे विजय नाना |
| ११ | मा.श्री.खैरे दिपक साहेबराव |

| | |
|---|---|
| १२ | मा.श्री.कोतकर सुनिल रामदास |
| १३ | मा.श्री.कोतकर संदिप भानुदास |
| १४ | मा.श्री.जगताप नितीन विलास |
| १५ | मा.श्री.शेख मुद्स्सर अहमद इसहाक |
| १६ | मा.श्री.पवार नामदेव शांताराम |
| १७ | मा.सौ.दिघे विमल रामचंद्र |
| १८ | मा.कांबळे मंगला राजकुमार |
| १९ | मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब |
| २० | मा.श्री.लोंढे संजयकुमार पांडुरंग |
| २१ | मा.श्री.चोपडा संजय फुलचंद |
| २२ | मा.श्री.खान समद वहाब |
| २३ | मा.श्री.कुरेशी मुश्ताक इब्राहिम |
| २४ | मा.श्री.शेख अरिफ शेख रफिउद्दीन |

सदरचा ठराव २८ विरूध्द २४ मतांनी मंजुर करण्यांत आला.

सदरची ठेका पध्दती दिनांक १-१०-२००५ पासुन १ वर्षाकरीता देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.शेळके सुरेश छबुराव.

अनुमोदक : मा.श्री.गंधे मिलिंद सदाशिव.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. १३-९-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

१ मागील दिनांक ११/८/०५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे

२ दुखवटयाचे प्रस्ताव

३ अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नियुक्तीच्या निविदेस मंजूरीदेणेबाबत ऑफीस रिपोर्ट

४ मा.सभासद यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : ९-९-२००५.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर.

कृपया टिप्पणी मागील पानावर पहावी.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : ९-९-२००५

श्री./ श्रीमती........................................

सदस्य,

अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा मंगळवार दिनांक १३-९-२००५ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मंगळवार दि. १३-९-२००५ रोजी दुपारी १=०० वाजता महानगरपालिका सभागृहांत होणां-या खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | मागील दिनांक ११/८/२००५ रोजीच्या झालेल्या खास सभेचे इतिवृत्त कायम करणे | नियमाप्रमाणे आहे.इतिवृत्त कायम करणेंस हरकत नाही. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव | टिप्पणी नाही |
| ३ | अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नियुक्तीच्या निविदेस मंजूरीदेणेबाबत ऑफीस रिपोर्ट | मंजूरीस शिफारस आहे. |
| ४ | मा.सभासद यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांकः-९-९-२००५.

नगरसचिव,

अहमदनगर

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दि.१३/९/२००५.

= = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = = =

प्रस्तावाचा विषय - अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नियुक्तीच्या निविदेस मंजूरी देणेबाबत ऑफीस रिपोर्ट.

--*--

ठराव : अहमदनगर महानगरपालिकेच्या जकात वसुली कामी अभिकर्ता नेमणुकीच्या निविदा प्रस्तावावर मा.महासभेत सर्व सभासदांची साधक बाधक चर्चा होउन्न असे ठरविण्यांत आले की,मे.श्री.साई एंटरप्रायजेस , उल्हासनगर यांची स्पर्धात्मकदृष्टया सर्वात जास्त असलेली देकार रक्कम रू.४०,४१,००,००० /- ची निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव मतदानासाठी टाकण्यांत आला. मतदान हात वर करून घेण्यांत आले. त्यामध्ये ठरावाच्या बाजुने खालील २८ सदस्यांनी मतदान केले.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.फुलसौंदर भगवान प्रल्हाद |
| २ | मा.श्री.खांडरे ज्ञानेश्वर सदाशिव |
| ३ | मा.श्री.शेळके सुरेश छबुराव |
| ४ | मा.श्री.साठे मनेष दशरथ |
| ५ | मा.सौ.सत्रे योगिता रंजित |
| ६ | मा.श्री.सुळ दिपक वसंतराव |
| ७ | मा.श्री.मैड सतिष बबनराव |
| ८ | मा.श्री.दातरंगे अर्जुन भाउत्साहेब |
| ९ | मा.सौ.सय्यद वर्षा अरिफ |
| १० | मा.सौ.शेख सुरैय्या लियाकत |
| ११ | मा.सौ.साहनी सुनिता राकेश |
| १२ | मा.सौ.मोरे सविता दिलीप |
| १३ | मा.श्री.बारस्कर पोपट जगन्नाथ |
| १४ | मा.श्री.डागवाले किशोर आसाराम |
| १५ | मा.श्री.कावरे आसाराम हरिभाउ |
| १६ | मा.श्री.गंधे मिलिंद सदाशिव |
| १७ | मा.श्री.कुलकर्णी नरेंद्र सच्चिदानंद |
| १८ | मा.श्री.तिवारी सुरेश रतनप्रसाद |
| १९ | मा.श्री.बोरूडे अनिल वसंतराव |
| २० | मा.सौ.गुंदेचा मंगला सतिष |
| २१ | मा.सौ.सकट पवित्रा भाउ |
| २२ | मा.सौ.दहिफळे कविता अशोक |
| २३ | मा.सौ.शिंदे कांताबाई अरूण |
| २४ | मा.सौ.शेंडगे रोहिणी संजय |
| २५ | मा.सौ.गुरूड राधा रमेश |
| २६ | मा.सौ.बिज्जा अर्चना संतोष |
| २७ | मा.सौ.मुदगल सुनिता दत्तात्रय |
| २८ | मा.बोरूडे इंदुबाई परशुराम |

तसेच ठरावाचे विरोधात खालील २४ सदस्यांनी मतदान केले.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | मा.श्री.कोतकर भानुदास एकनाथ |
| २ | मा.श्री.बोरा किशोरकुमार हिंमतलाल |
| ३ | मा.श्री.त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण |
| ४ | मा.श्री.उडाणशिवे भाउत्साहेब भिमाजी |
| ५ | मा.श्री.शिंदे दशरथ बाबु |
| ६ | मा.श्री.जाधव कृष्णा दत्तात्रय |
| ७ | मा.श्री.सय्यद सादिक अरिफ |
| ८ | मा.सौ.भागानगरे मनिषा प्रकाश |
| ९ | मा.श्री.चव्हाण दिप नारायण |
| १० | मा.श्री.गव्हाळे विजय नाना |
| ११ | मा.श्री.खैरे दिपक साहेबराव |
| १२ | मा.श्री.कोतकर सुनिल रामदास |
| १३ | मा.श्री.कोतकर संदिप भानुदास |
| १४ | मा.श्री.जगताप नितीन विलास |
| १५ | मा.श्री.शेख मुद्स्सर अहमद इसहाक |
| १६ | मा.श्री.पवार नामदेव शांताराम |
| १७ | मा.सौ.दिघे विमल रामचंद्र |
| १८ | मा.कांबळे मंगला राजकुमार |
| १९ | मा.सौ.पवार संध्या बाळासाहेब |
| २० | मा.श्री.लोंढे संजयकुमार पांडुरंग |
| २१ | मा.श्री.चोपडा संजय फुलचंद |
| २२ | मा.श्री.खान समद वहाब |
| २३ | मा.श्री.कुरेशी मुश्ताक इब्राहिम |
| २४ | मा.श्री.शेख अरिफ शेख रफिउद्दीन |

सदरचा ठराव २८ विरूध्द २४ मतांनी मंजुर करण्यांत आला.

सदरची ठेका पध्दती दिनांक १-१०-२००५ पासुन १ वर्षाकरीता देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

ठराव बहुमताने मंजुर.

सुचक : मा.श्री.शेळके सुरेश छबुराव.

अनुमोदक : मा.श्री.गंधे मिलिंद सदाशिव.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर

प्रस्ताव क्रमांक : ४ दि. १३-९-२००५.

प्रस्तावाचा विषय - मा.सभासद यांचे रजेचे अर्ज.

-**-

प्रस्तावाचा मजकूर : खालील मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज मा.खास सभेपुढे ठेविले.

| अ.नं. | मा.सदस्यांचे नांव | सभा रजेची तारीख |
|---|---|---|
| १ | मा.श्री.वाकळे बहिरनाथ तुकाराम | १३-९-२००५ |
| २ | मा.श्री.कानडे अशोक नाथा | १३-९-२००५ |
| ३ | मा.श्री.पाऊलबुधे विनीत नाथ | १३-९-२००५ |
| ४ | मा.सौ.गंगेकर अंजना राजू | १३-९-२००५ |
| ५ | मा.सौ.काळे गितांजली सुनिल | १३-९-२००५ |
| ६. | मा.श्री.आगरकर अभय जगन्नाथ | १३-९-२००५ |
| ७ | मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत | १३-९-२००५ |
| ८. | मा.श्री.घुले अविनाश हरिभाऊ | १३-९-२००५ |
| ९ | मा.सौ.खरपुडे जयश्री सुरेश | १३-९-२००५ |
| १०. | मा.श्री.घुले शंकरराव हरिभाऊ | १३-९-२००५ |

ठराव : रजेचे अर्ज मंजूर.
नोंद घेण्यांत येत आहे.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## <u>दि.१३-९-२००५ खास सभेपुढील चर्चा</u>

<u>विषय क्र.२ :</u> दुखवटयाचे प्रस्ताव.

अ) श्री.बाबु घुंगर चव्हाण यांचे दुःखद निधनाबाबत दुखवटयाचा प्रस्ताव संमत करण्यात यावा. असे श्री.कृ.द.जाधव, नगरसेवक यांनी सुचविले.

त्याचप्रमाणे १) श्री.दत्तुशेठ कोतकर २) श्री.दादासाहेब पवार ३) श्री.प्रेमसुख गांधी यांचे दुःखद निधनानिमित्त प्रस्ताव संमत करणेबाबत मा.श्री.संदिप कोतकर यांनी सुचविले.

यानंतर दुखवटयाचे ठराव मंजूर करण्यात आले.

विषय क्र.३ : जकात अभिकर्ता नियुक्तीच्या निविदेस मंजुरी देणेबाबतच्या विषयावरील चर्चा.

१) मा.श्री.आसाराम कावरे - जकातीचा ठेका देण्यात यावा. कारण यामध्ये ७ कोटी ४१ लाखाचा महानगरपालिकेला फायदा होणार आहे. यापूर्वी व्यापा-यांना १० वर्षे जकात माफ केलेली होती. त्यामुळे ठेकेदारांना १ वर्षासाठी जकात वसुली देण्यास हरकत नाही. कर्मचा-यांचे पगार थकलेले आहेत. ५व्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यात आलेली नाही. त्यामुळे जास्तीत जास्त रक्कम देणारे ठेकेदारास ठेका देण्यात यावा.

२) मा.श्री.कृ.द.जाधव - जकात लावावयाची कि नाही हा प्रश्न या ठिकाणी निर्माण होत नसून जकात लावलेली आहेच. फक्त ठेकेदाराकडून वसुली करावयाची किंवा कसे? अशाबाबतचा आजचा विषय आहे. स्थायी समितीने सदरचा विषय नामंजूर केलेला आहे. सदरचे काढण्यात आलेले टेंडर हे आर्थिक वर्षाकरीता काढलेले नाही. याबाबत दर आणि करास मंजूरीबाबत चर्चा झालेली नाही. आमच्या मते पुन्हा याबाबत चर्चा करुन फेब्रुवारीमध्ये जकात लागु करावी. प्रशासनाकडून चुका झाल्या तर सर्वच गोष्टी कळतात असे नाही. याबाबत इतके गंभीर परिणाम होतील अशी जाणीव नव्हती. बाहेरचे गुंड येउन येथे जकात वसुल करु शकतील एवढी घाई कशासाठी.

ठेका ३१ ऑगस्ट २००५ ते ऑगस्ट २००६ अखेर आहे. तो कालावधी मार्च अखेरपर्यंत घ्यावयास पाहिजे होता. जकात ३१ मार्च पर्यंत टेंडर देउ नये. जकात महानगरपालिका कर्मचा-यां मार्फत वसुल करावी.

३) मा.श्री.संजय चोपडा - जकातीला विरोध नाही. दर आणि कर ठरविणेबाबत व्यापा-यांना विश्वासात घेउन ठरवू असे सांगितले होते. आजही व्यापारी जकात भरुनच माल आणत आहेत. मात्र जकात वसुली ठेकेदारास देण्यात येउ नये.

४) मा.श्री.दिपक सुळ - व्यापा-यांनी जकात भरावयाची तर ठेकेदार यांच्याकडे भरली काय किंवा महानगरपालिका कर्मचा-यांकडे भरली काय? ठेकेपध्दतीमुळे महानगरपालिकेला ७ कोटी रुपये जादा मिळणार आहेत. यामध्ये आस्थापना खर्चाचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे जकात ठेका देण्यास हरकत नाही. ब-याच प्रायव्हेट कंपन्या जकात चोरुन आणतात. त्यामध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते. व आर्थिक हिताच्यादृष्टीने ठेकेदारास ठेका देणेस हरकत नाही. कराचे दर हे वाढलेले नाहीत तर हे दर पूर्वीचेच सन १९८४ पासूनचे आहेत. फक्त आता किंमती वाढलेल्या आहेत. म्हणून जकात वाढल्याचे दिसते.

५) मा.श्री.दिप चव्हाण - महानगरपालिकेने स्थायी समितीला निर्णय घेण्याचे अधिकार प्राप्त करुन दिले असताना व स्थायी समितीमध्ये दि.३१-८-०५ रोजी याबाबतचा ठराव नामंजूर केल्यानंतर सभागृहामध्ये सदरचा ठराव येण्याचा संबंधच येत नाही. कार्यालयाने तोच तोच रिपोर्ट पुन्हा ठेवलेला आहे. त्यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. त्यामुळे तो येथे येण्याचा संभवच नव्हता. मिस्कीन मळाबाबतचा ठराव अशाच प्रकारे नामंजूर झाला होता. तो येथे का घेतला गेला नाही? मागे मा.जिल्हाधिकारी देवरा साहेब यांनी अभिकर्ता नेमण्याचा प्रस्ताव मे.शासनाकडे पाठविला होता. त्यावर शासनाने तो प्रस्ताव स्थायी समिती / महासभेपुढे ठेवणेबाबत महापालिकेस कळविलेले होते.

अशा प्रकारे स्थायी समितीच्या हक्कावर गदा आणली जात आहे असे दिसते. यापूर्वी २४ कोटी रुपयांचा प्रस्ताव नामंजूर का केला होता? चालू वर्षी जकात बाबत बजेट हेड नाही. बजेट मध्ये जकात कायदा ॲबॉलीश केला आहे.

महानगरपालिकेमध्ये जकातीचे पैसे कोणत्या खात्यात भरण्यात येतात याचा खुलासा करावा. माझे माहितीप्रमाणे सदरचे पैसे रोजगार हमी व शिक्षण कर खात्यात भरले जातात. यामध्ये सभागृह व जनतेची दिशाभूल केली जात आहे.

जकात ठेक्याबाबत स्थायी समितीच्या निर्णयानंतर १४ दिवसांनी मिटींग घेतली. ती ७ दिवसात घेणे आवश्यक होते. त्यामुळे मिटींग बेकायदेशीर आहे. शहरामध्ये शांतता व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होउन नागरिकांना त्रास होणार आहे. पैशासाठी काहीही करावयाचे असे ठरवले आहे काय.त्यापेक्षा महानगरपालिकेने सावकारी पतपेढी अथवा बँक स्थापन करावी. अंदाजपत्रकामध्ये २४ कोटीचा अंदाज असताना ४० कोटीवर ठेका कसा काय गेला?

महानगरपालिका कर्मचा-यांवर अविश्वास दाखवू नका. शहराची शांतता भंग होईल. ठेका देण्यामध्ये कोणते हित आहे. ठेकेदार यामधून ५० कोट वसुल करणार आहे. याचा सर्व बोजा जनतेवर पडणार आहे. हे कायदयाला धरुन नाही. पध्दत बेकायदेशीर आहे. ठेकेदाराला ठेका दयावयाचा असा आपण ठेका घेतला काय?

स्थायी समितीचे अधिकाराबाबत काय तरतुदी आहेत हे स्पष्ट करावे. व खुलासा करावा असे सुचविले.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये ३ ॲथॉरिटी आहेत. १) आयुक्त २) स्थायी समिती व ३) महासभा. महासभा ही सर्वोच्च आहे. स्थायी समितीचा ठराव विखंडीत करणेबाबत शासनाकडे पाठविलेला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण यांनी यावर सांगितले की, ठेकेदारी पध्दतीस माझा विरोध आहे. मी या ठिकाणी मत मांडण्यास आलेलो नाही. एकदा स्थायी समितीला अधिकार दिलेले असताना व ठराव एकमताने फेटाळलेला आहे. तोच ठराव पुढे मांडलेला आहे. त्यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, महासभा ही सर्वोच्च सभा आहे. त्यावर श्री.दिप चव्हाण यांनी ठेकेदारीस विरोध आहे असे सांगितले. मा.महापौर यांनी तुमचा विरोध आहे असे नोंदवून घेतले जाईल हे सांगितले. तथापी स्थायी समितीने एकदा फेटाळलेला ठराव पुन्हा घेतला तर जबाबदारी त्यांचीच राहील असे सांगितले.

६) मा.श्री.नामदेव पवार - ठेका ऑगस्ट ०५ ते ऑगस्ट ०६ असे आहे. बजेट मार्च पर्यंतच आहे. एस्कॉर्ट रु.२० ऐवजी ५० करावा. इतर महानगरपालिकेमध्ये ५० ते १५० रुपये पर्यंत आहे. ३१ मार्च पर्यंत कर्मचा-यामार्फत वसुली करुन मार्च नंतर ठेक्याबाबत विचार करावा. जकात दर निश्चित करुन पुन्हा नव्याने विषय घ्यावा. महानगरपालिका कर्मचा-यामार्फत जकात चालू आहेच. महानगरपालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा.

७) मा.श्री.सुरेश शेळके - ठेक्याला मंजुरी दयावी. त्यासाठी ओपन मतदान घ्यावे असे सुचविले.

८) मा.श्री.किशोर बोरा - प्रशासन स्वतः जकात वसुल करते. त्यावर विश्वास का ठेवला जात नाही. प्रशासनामार्फत ४१ कोटी रुपयांपेक्षा जास्त जकात वसुल होउ शकते. न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे. जकातीचे वसुल होणारे पैसे सध्या वापरता येत नाही. न्यायालयीन निकालानंतर ठेकेदारीबाबत निर्णय घ्यावा. ठेकेदारीस विरोध नोंदवावा असे सुचविले.

९) मा.श्री.त्रिपाठी - जकात अभिकर्ता नेमण्यास विरोध आहे. व्यापा-यांबददल दुराग्राह चालू आहे. व्यापारी सुध्दा नागरिक आहेत. जकात न लावणेबाबत यापूर्वी आश्वासन दिलेले होते. स्थायी समितीने जकातीचा विषय नामंजूर केलेला आहे. यापूर्वी शेतमालाला अर्धा टक्का जकात होती. ती १० पट झालेली आहे. डिझेलवर पुणे येथे ३ टक्के, नाशिक येथे २ टक्के तर नगरने ४ टक्के लावलेली आहे. याचा विचार झाला पाहिजे.

यावर श्री.सुरेश शेळके यांनी सांगितले की, सन १९९९ पासून जकात कर नव्हता. त्यानंतर पेट्रोल डिझेलचे दर कमी झालेले होते काय? अशी विचारणा केली.

त्याच वेळेस सभागृहामध्ये गोंधळ निर्माण झाला. व त्याचवेळी सर्वश्री त्रिपाठी, श्री.शेळके, श्री.कोतकर, श्री.गंधे, श्री.सुळ इ.नगरसेवक बोलत होते.

१०) मा.श्री.भानुदास कोतकर - सर्वसाधारण सभेच्या वेळी महानगरपालिका कर्मचा-यांनी खाली धरणे धरुन घेराव घातलेला आहे. त्यांच्या आंदोलन ठेका मंजूर करणेसाठी त्यांना तसा अधिकार आहे काय? त्या कर्मचा-यांवर कारवाई करण्यात यावी.

जकातीचे ठेका देणेबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीने नामंजूर केलेला आहे. तथापी जकात लावू नये असे म्हणणे नाही. परंतु शहरातल्या नागरिकांवर दरडोई १६००/- रु.इतका टॅक्स बसणार आहे. महानगरपालिकेने एस्कॉर्ट २० रु.लावला आहे त्याऐवजी इतर महानगरपालिकेच्या माहितीच्या आधारे एस्कॉर्ट दर लावावा. व जकातीचे दर कमी करावेत. महानगरपालिकेने जकातीला पर्यायी उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करावेत. एस्कॉर्ट कर लागु केल्यास दररोज ८ लाख रु. उत्पन्न मिळते. व उर्वरीत रकमेकरीताच जकात कर लावावा असे सुचविले.

मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, जकातीच्या आंदोलनाबाबत कर्मचा-यांच्या संघटनेनी महानगरपालिकेला कळविलेले नाही. त्याबाबत नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

त्यानंतर मा.श्री.कोतकर यांनी सांगितले की, ठेकेदारीस काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांचा विरोध आहे. विरोध नोंदवावा असे सांगितले.

मा.आयुक्त यांनी आर्थिक जबाबदारीबाबत महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर वेतनासाठी तसेच मुळा पाणीपुरवठा बील इ. तसेच दैनंदिन खर्च मोठया प्रमाणावर करावा लागत आहे. दरमहा अंदाजे ३ कोटी रु. यासाठी लागतात. त्यासाठी आर्थिक हिताच्या जबाबदारीचे निर्णय घ्यावयास पाहिजे.

११) मा.सौ.गंगेकर - व्यापा-यांचा जकातीस विरोध नाही. मनपा कर्मचा-यामार्फत जकात वसुली करावी.

१२) मा.श्री.गंधे - भाजपा शिवसेना यांनी जकातीस सुरुवातीस विरोध केलेला होता. तथापी आर्थिक चित्र नंतर स्पष्ट झाल्याने यास आम्ही पाठींबा दिलेला आहे. यापूर्वी अभिकर्ता नेमण्यास मंजुरी दिलेली होती. व स्थायी

समितीने याबाबत विचार करुन मंजूर करावा असा प्रस्ताव मांडलेला होता. त्यामुळे हा प्रस्ताव महासभेपुढे आलेला आहे. विकासासाठी जकात आवश्यक आहे.  कर्मचा-यांमार्फत ५० टक्के वसुली होत आहे. जकात ३६५ दिवसांसाठी आहे. १ वर्षानंतर आपणास फेरविचार करता येईल. तरी ठेकेदारीस मंजुरी दयावी असे सुचविले. याबाबत आचारसंहिता तयार केलेली आहेच.

शेवटी मा.महापौर यांनी याबाबत मतदान घेण्यात येईल असे जाहीर केल्यानंतर हात उंचावून मतदान घेण्यात आले.